दिनांक : ४/१/२०१०

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

*नूतन वर्षाच्या आपणास हार्दिक शुभेच्छा!*

वृत्तपत्र विद्या पदवी (बी. जे.), वृत्तपत्र विद्या पारंगत (भाग १) या अभ्यासक्रमासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक परीक्षेचा एक भाग म्हणून अंतर्गत मूल्यमापन/कार्यानुभव हा तीनशे गुणांसाठी विषय आहे. त्यात तुम्हाला

१) **शोध निबंध** २) **प्रश्नपेढीवर आधारित प्रश्न आणि** ३) **असाइनमेंट्स**

असे तीन विषय असून प्रत्येक विषयासाठी १०० गुण या प्रमाणे ३०० गुणांची परीक्षा किंवा प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन केले जाते.

**शोधनिबंधासाठी या वर्षीचे विषय**

१) वेगळ्या राज्यांचा तिढा आणि २) भडका महागाईचा असे दोन विषय असून, यापैकी एक विषय निवडून त्यावर सुमारे २५ ते ३० पानांचा शोधनिबंध सादर करावयाचा आहे.

शोधनिबंधामध्ये तुम्ही आंध्र प्रदेशाचे विभाजन करून वेगळ्या तेलंगणाची निर्मिती करण्याच्या मान्य झालेल्या मागणीनंतर उद्‌भवलेली परिस्थिती, तेलंगणा राज्याच्या मागणीची पार्श्वभूमी, अनेक राज्यांतून पुढे आलेल्या वेगळ्या राज्यांच्या मागण्या, त्याचे देशाच्या एकात्मतेवर होणारे परिणाम, या मागण्यांमागील राजकारण असे वेगळे मुद्दे विचारात घेऊन लेखन करावयाचे आहे.

'भडका महागाईचा' या शोधनिबंधामध्येही आर्थिक मंदीच्या संकटानंतर गेल्या वर्षभरात वाढत चाललेली महागाई, महागाईची कारणे, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, साठेबाजी, सर्व सामान्य माणसावर महागाईचा होणारा परिणाम, कोलमडलेले कौटुंबिक अंदाजपत्रक, त्यासंदर्भात काही बोलक्या प्रतिक्रिया, मुलाखती या आधारे तुम्ही लिहू शकाल.

शोधनिबंधात काही आकडेवारी, तक्ते, आलेख, मुलाखती, प्रश्नावली, छायाचित्रे यांचाही समावेश करावा. शोधनिबंध हस्ताक्षरात किंवा डी. टी. पी करून विद्यापीठाकडे सादर करावा.

**प्रश्नपेढीवर आधारित प्रश्न** : तुम्हाला विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या प्रश्नपेढीतील ४ विषय आणि त्यांचे पोटविषय असे किमान ६० ते ७० प्रश्न सविस्तर लिहावयाचे आहेत. एका विषयाचे किमान १५ प्रश्न सोडवावेत.

**असाइनमेंट्स** : सोबत स्वतंत्रपणे असाईन्मेंटचे प्रश्न जोडले आहेत. त्यातील १२ प्रश्न निवडून त्यावर सविस्तर टिपणे विद्यार्थ्यांनी लिहावयाची आहेत.

या तिन्ही फाईल्स १५ मार्च २०१० पूर्वी विद्यापीठात जमा होणे आवश्यक आहे.

वृत्तपत्र विद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या (सी.जे.) विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रश्नपेढीतील विषयाचे किमान १० या प्रमाणे ३० प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहावयाची आहेत. या विद्यार्थ्यांसाठी कात्रण संग्रह हा विषय आहे. त्यासाठी 'महागाई' गेल्या तीन–चार महिन्यांत हा विषय सर्वसामान्यांच्या दृष्टीने चिंतेचा विषय बनला आहे. जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, फळे या आवश्यक गोष्टींची भाववाढ सर्वसामान्यांना संकटात नेणारी आहे. त्या अनुषंगाने विविध वृत्तपत्रांतून त्यासंबंधीच्या बातम्या, लेख, आलेख, अग्रलेख असा मजकूर प्रसिद्ध होत आहे. सर्व सामान्यांच्या मुलाखतीही प्रसिद्ध होत आहे. ही सर्व कात्रणे एकत्रित करुन विद्यार्थ्यांनी कात्रण संग्रह तयार करावयाचा आहे.

**बी. जे. च्या विद्यार्थ्यांसाठी असाईन्मेंटचे विषय**

१) संकट स्वाइन फ्ल्यूचे

२) महाराष्ट्रातील निवडणूक रणधुमाळी

३) तंटामुक्ती अभियान

४) ओबामांना शांततेचे नोबेल

५) नक्षलवाद्यांशी लढा

६) आयबीएन–लोकमतवरील हल्ला

७) शिवसेनेला लागली ओहोटी

८) वीजटंचाईची कारणे आणि उपाय

९) ग्रामीण भागातील आरोग्य समस्या

१०) साखर कारखानदारीच्या समस्या

११) रुचिकाला न्याय मिळणार का?

१२) कोपनहेगन परिषदेची फलनिष्पत्ती

१३) पत्रकारांवरील हल्ले आणि सरकारची निष्क्रियता

१४) स्टिंग ऑपरेशन – किती योग्य, किती अयोग्य?

१५) प्रदूषणाची समस्या

१६) सुलोचनादीदींना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

१७) माहितीचा अधिकार : जनतेच्या हाती शस्त्र

१८) महिलांसाठी खुली कारागृहे

१९) अशी रंगली महाराष्ट्र 'केसरी' कुस्ती स्पर्धा

२०) हेडलीचे प्रताप!

**रामदास नेहूलकर**
समन्वयक, वृत्तपत्राविद्या अभ्यासक्रम
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे